नि.फौ.प्र.क्र.१६/२०२४
सरकार -वि.- जगन नारखेडे+१३
**निशाणी क्र.२६८**

## सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ०६ याची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
नांव - प्रमोद विष्णु पाटील,
वय - ५८ वर्षे, व्यवसाय – शेती,
रा. - कुंड (बु), ता. मलकापुर जि.बुलडाणा

**सरतपास- सरकारी अभियोक्ता श्री.आर.बी. देवराज यांचेमार्फत शपथेवर सुरु....**

मी शेती व्यवसाय करित असून माझ्या नावावर आडीच एकर शेती आहे. तसेच माझ्या पत्नीच्या नावे १ एकर १० गुंठे जमीन आहे. मी पूर्वीपासून शेती हाच व्यवसाय करीत आहे. सन २०२२ मध्ये मी कापूस पेरला होता. त्यावेळी माझ्या शेतातून २९ क्वींटल कापसाचे उत्पन्न निघाले होते. त्यावेळी साडेसात ते आठ हजार प्रति क्वींटल इतका भाव होता. त्यावेळी तो कापूस मी विकला होता. तो कापूस मी राजेंद्र पांडुरंग पाटील व शरद बोरले यांना विकला होता. ते कापूस घेवून गेले. तिस-या दिवशी मला त्यांनी मला चेक दिला. तो चेक मी बँकेत जमा केला. परंतु तो चेक अनादरित झाला. तो धनादेश २,६६,०००/- वरती काही तरी इतक्या रकमेचा होता. तो कापूस त्यांनी आयशर टेम्पो यातून नेला. तो धनादेश मी परत बँकेत पैसे जमा होण्याकरीता टाकला परंतु तो परत अनादरीत झाला. त्याबाबत मी शरद बोरले यांच्याशी बोललो होतो. त्यावेळी त्यांनी मला पैसे देण्यास नकार दिला. त्यानंतर मी पोलीस स्टेशनला जाऊन आरोपींविरुध्द तक्रार दिली. मी त्या दोन्ही आरोपींना ओळखतो. ते आज न्यायालयात हजर आहेत. मी पोलीसांना शेताचा ७/१२ व चेकची झेरॉक्स तपासाकामी दिली होती.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास- आरोपी क्र.१ तर्फे विधीज्ञ श्री.एन.सी.जाधव यांचेमार्फत सुरु....**

०२. मी पोलीसांना तपासाकामी ७/१२ उतारा दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो त्याप्रमाणे अशी माझ्याकडे कोणतीही शेती नाही, मी कोणताही कापूस पिकवलेला नाही व तसेच मी तो कापूस मी कोणालाही विकलेला नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**उलटतपास- आरोपी क्र.२ व ३ तर्फे विधीज्ञ श्री.तांदुळकर यांचेमार्फत सुरु....**

०३. मी राजेंद्र व शरद बोरले यांच्याविरुध्द तक्रार दिली होती. त्या तक्रारीची तारिख आठवत नाही. ती तक्रार मी मलकापुर शहर पोलीस ठाणे येथे दिली होती. त्या तक्रारीच्या अनुषंगाने माझी चौकशी झाली होती. जी तक्रार मी दिली होती त्या अनुषंगाने मी पोलीसांना कागदपत्रे दिले होते. मी ७/१२ व चेक असे कागदपत्र दिले होते. माझ्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलीसांनी इतर लोकांकडे चौकशी केली होती. माझ्या तक्रारीवरून आरोपींविरुध्द गुन्हा दाखल झाला होता. मला त्याचा अपराध क्रमांक व गुन्हयाचे कलम सांगता येणार नाही. पोलीसांनी माझ्या तक्रारीच्या अनुषंगाने दोषारोप पत्र दाखल केल्याबाबत मला काही सांगितलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, जी तक्रार मी आरोपी क्र. २ व ३ यांच्याविरुध्द केली होती त्या तक्रारीमध्ये पोलीसांना कोणतेही तथ्य आढळून आले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे असा कोणताही व्यवहार तपासात निष्पन्न झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या तक्रारीवरून आरोपींविरुध्द गुन्हा नोंदवला गेल्याचे मी खोटे सांगत आहे.

०४. मी माझ्याकडे असलेल्या अडीच एकराचा प्रमाणित ७/१२ उतारा पोलीसांना दिला आहे. मी पोलीसांना बयाण देवेवेळी माझ्या पत्नीच्या नावे १ एकर १० गुंठे जमीन असल्याचे सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, सदरची बाब आज मी पहिल्यांदा न्यायालयात सांगत आहे. मी सन २०२२ मध्ये कापूस पेरल्याबाबत वेगळे पेरे पत्रक पोलीसांना दिलेले नव्हते. मी पोलीसांना बयाण देतेवेळी तिस-या दिवशी मला त्यांनी मला चेक दिला. तो चेक मी बॅंकेत जमा केला. परंतु तो चेक

अनादरित झाला. तो धनादेश २,६६,०००/- वरती काही तरी इतक्या रकमेचा होता. सदर बाबी माझ्या बयाणात का नाहीत याचे कारण मी सांगू शकत नाही. मी पोलीसांना बयाण देतेवेळी तो धनादेश मी परत बँकेत पैसे जमा होण्याकरीता टाकला परंतु तो परत अनादरीत झाला. त्याबाबत मी शरद बोरले यांच्याशी बोललो होतो. त्यावेळी त्यांनी मला पैसे देण्यास नकार दिला असे सांगितले होते. सदर बाबी माझ्या बयाणात का नाहीत याचे कारण मी सांगू शकत नाही. मी पोलीसांना बयाण देतेवेळी साडे सात ते आठ हजार प्रति क्वींटल भाव होता असे सांगितले होते. सदर बयाणातील आठ हजार प्रति क्वींटल हा मजकुर माझ्या बयाणात नाही व ते का नमुद नाही त्याचे कारण मी सांगू शकत नाही. मी पोलीसांना बयाण देतेवेळी शेताचा ७/१२ व चेकची झेरॉक्स तपासाकामी दिल्याचे सांगितले होते सदर बाब माझ्या बयाणात नमूद नाही ती बाब माझ्या बयाणात का नमुद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही.

०५. हे म्हणणे खरे आहे की, जो धनादेश मला कापसापोटी देण्यात आला त्यावर जगन्नाथ रामचंद्र नारखेडे याची स्वाक्षरी होती. हे म्हणणे खरे आहे की, याच्याशिवाय त्या धनादेशावर दुस-या कोणाचीही सही नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, त्या धनादेशावर आरोपी क्र. २ व ३ यांची सही नसल्यामुळे त्यांची धनादेशाची रक्कम देण्याची जबाबदारी नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, राजेंद्र पाटील यांचा राष्ट्रीय महामार्गावरील कुंड फाट्यावर हॉटेलचा व्यवसाय असून तो त्यांचा एकमेव व्यवसाय आहे. मला आयशर गाडीचा क्रमांक सांगता येणार नाही. ती गाडी कोणाची होती हे ही मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी राजेंद्र पाटील व शरद बोरले यांना कापूस विकल्याचे व ते घेउन गेल्याचे खोटे सांगत आहे. माझ्याकडे कापूस मोजण्याकरिता कापसाच्या काटेपट्टया माझ्याकडे उपलब्ध नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी त्या कापसाच्या वजनाच्या नोंदी घेतलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ ने त्याचा स्वतःचा देखील आरोपी क्र. १ याला कापूस विकला आहे. त्या कापसाचे पैसे अजूनही राजेंद्र पाटील याला मिळालेले नसल्याचे मला माहीत नाही. माझे अतुल मधुकर पाटील यांच्यासोबत चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे

आहे की, अतुल पाटील हे ग्रामपंचायतचे उपसरपंच होते व आजही सदस्य आहेत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिष्ठीत व्यक्ती असल्यामुळे त्यांचा गावावर चांगला प्रभाव आहे. हे म्हणणे खरे नाही की, गावातील लोक सहसा त्यांचा शब्द टाळत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, त्यांनी सांगितल्याप्रमाणे मी आरोपी क्र. २ व ३ यांच्याविरुध्द आज साक्ष देत आहे. मी या प्रकरणातील म्हटलेला धनादेश अनादरीत झाल्याबाबतची खाजगी फिर्याद किंवा ती वसुल करण्याकरिता दिवाणी दावा कोणाविरुध्दही दाखल केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी त्या धनादेशाच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही मी वैयक्तीक रित्या केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ व ३ यांचे कोणतेही पैसे देणे लागत नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द कोणतीही वसुलीची कार्यवाही केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या सांगण्यावरून खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण .

**<u>उलटतपास- आरोपी क्र.५ तर्फे विधीज्ञ श्रीमती एन.के.डोसे यांचेमार्फत सुरु....</u>**

०६. आरोपी क्र. २ व ३ यांच्यातर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.६,७, ९ व १४ तर्फे विधीज्ञ श्री.जी.डी.पाटील यांचे मार्फत सुरु....</u>**

०७. आरोपी क्र. २ व ३ यांच्यातर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.८ तर्फे विधीज्ञ श्री.एन.एस.तायडे यांचेमार्फत सुरु....</u>**

०८. आरोपी क्र. २ व ३ यांच्यातर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१० तर्फे विधीज्ञ श्री.एस.डी.मराठे यांचेमार्फत सुरु....</u>**

०९. आरोपी क्र. २ व ३ यांच्यातर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**उलटतपास- आरोपी क्र.१३ तर्फे विधीज्ञ श्री.बी.एस.वानखेडे यांचेमार्फत सुरु....**

१०. आरोपी क्र. २ व ३ यांच्यातर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**उलटतपास- आरोपी क्र.११ तर्फे विधीज्ञ श्री.आर.एस. जगताप यांचेमार्फत सुरु....**

११. आरोपी क्र. २ व ३ यांच्यातर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**उलटतपास- आरोपी क्र.१२ तर्फे विधीज्ञ श्रीमती आर.डी.संचेती यांचेमार्फत सुरु....**

१२. आरोपी क्र. २ व ३ यांच्यातर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**उलटतपास- आरोपी क्र.०४ तर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.शेख यांचेमार्फत सुरु....**

१३. आरोपी क्र. २ व ३ यांच्यातर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PARAG SATISH THAKARE
Date: 2025.07.23 17:35:53 +0530

दिनांक : २३/०७/२०२५.

**( पी.एस.ठाकरे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.१), मलकापूर